**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष बबनराव ऊर्फ आप्पासाहेब जेबले
कसबा पेठ, पवार गल्ली, केबलवाले खरात यांचे शेजारी,
मु.पो.ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, फलटण नगरपरिषद,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५० / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.सुभाष बबनराव ऊर्फ आप्पासाहेब जेबले
कसबा पेठ, पवार गल्ली, केबलवाले खरात यांचे शेजारी,
मु.पो.ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे श्री.प्रकाश पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, फलटण नगरपरिषद,
फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.डी.के.नलवडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.५.३००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती (संक्षिप्त)**<br><br>यादी देणारे नगरसेवक हे ठरावाचे सूचक अनुमोदक असणे याबाबत विशिष्ट नियम आहे का, ठराव क्र.४१, दि.२७.५.२००५ ची नक्कल, सामाजिक सभागृह विशिष्ट समाजासाठी त्यांच्या मागणीप्रमाणे बांधण्यात येत आहे का, रजिस्ट्रेशन आहे का, ठराव क्र.३८ व ४१ बाबतची सर्व माहिती, टिपणीसह, वॉल कंपौंड व सभागृह बांधून मिळण्याबाबत ट्रस्टींचा ठराव नगरपरिषदेकडे प्राप्त आहे का, कोणत्या निधीतून सदर कामे मंजूर आहेत, सन १९९१ पासून झालेले ठराव वैध आहेत का, बांधकामाच्या जागेची पहाणी कोणी करावी, रस्त्यापासून खुल्या ठेवावयाच्या अंतराबाबत विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदी, क्षेत्रिय अधिकाऱ्यांचा अहवाल इ. माहिती. | |

## विवेचन

जन माहिती अधिकाऱ्यांनी खोटी व विसंगत माहिती दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणी न घेता निकाल दिला, अशा कारणावरुन अपीलकर्ता श्री.सुभाष बबनराव ऊर्फ आप्पासाहेब जेबले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.२३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

आपली बहीण कु.प्रतिभा जेबले यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, फलटण नगरपरिषद, फलटण, जि.सातारा यांच्याकडे माहिती मागितली होती. त्यावर दिलेल्या माहितीबाबत १७ मुद्दयांचा खुलासा श्री.जेबले यांनी माहितीची मागणी करणाऱ्या अर्जात केला होता व त्याव्यतिरिक्त २५ मुद्दयांची माहिती मागितली होती. आपल्या व आपल्या बहिणीच्या अर्जातील मुद्दे समान असून माहिती मात्र वेगवेगळी दिली आहे. क्षेत्रिय अधिकाऱ्यांचा अहवाल नसल्याचे

आपल्याला कळविले, तर अहवाल असल्याचे आपल्या बहिणीला कळविले, एकाच ठरावाच्या तीन वेगवेगळ्या प्रती दिल्या. तिसऱ्या प्रतीवर वादग्रस्त मजकुराची जागा कोरी ठेवून सत्यप्रत असे म्हटले, अशा प्रकारे जन माहिती अधिकाऱ्यांनी दिशाभूल करणारी माहिती दिली. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.सदानंद कोचे यांनी सुनावणी न घेता निकाल दिला. प्रतिवादी सुनावणीला हजर नव्हते, त्याबद्दल त्यांना नोटीसही काढण्यात आली आहे. असे असताना निकालपत्रात मात्र ते उपस्थित असल्याचे म्हटले आहे. वॉर्ड क्र.५ मध्ये चक्रधरस्वामी मंदिर शुक्रवार पेठ, येथे सभागृह बांधण्यासाठी ठरावात दर्शविलेला खर्च व जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीत नमूद केलेला खर्च यात तफावत आहे. अचूक खर्चाची आकडेवारी अपीलकर्त्यास १५ दिवसात द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी देऊनही पुन्हा चुकीची माहितीच देण्यात आली, असे प्रतिपादन श्री.जेबले यांनी केले.

श्री.जेबले यांच्या बहिणीचा अर्ज आधी होता. त्यावेळी क्षेत्रिय अधिकारी नेमलेले नव्हते. श्री.जेबले यांनी अर्ज केला तेव्हा या नेमणुका झालेल्या असल्यामुळे तशी माहिती व नेमणुकीची मूळ प्रत दिली. ठरावाबाबतच्या माहितीमध्ये एका ठिकाणी सूचक व अनुमोदक यांच्याविषयी टंकलेखनात दोष होता, त्याबाबतचे दुरुस्तीपत्र त्यांना लगेच देण्यात आले. एकाच ठरावाच्या वेगवेगळ्या प्रती दिलेल्या नाहीत. ठरावा क्र.४१ व ४२ ची नोंद समजून घेण्यामध्ये गल्लत होत आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री.डी.के.नलवडे यानी केले. सर्व कागदपत्रे समक्ष पाहता येतील, अशा स्वरुपाचे पत्र जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.जेबले यांना दिले होते. टंकलेखनातील दोषाबाबतचा खुलासा लगेच करण्यात आला. नोंदवहीत ठरावाची नोंद केल्यानुसार छायांकित प्रती दिल्या आहेत. मात्र श्री.जेबले यांनी त्या नीट समजून न घेतल्यामुळे गैरसमज होत आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त(सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी केले. संबंधित नोंदपुस्तक त्यांनी हजर केले व ठरावाचा क्रमांक, ठरावातील तपशील, सूचक-अनुमोदक यांची नावे इ. बाबी दर्शविल्या. त्यानुसार दिलेली

माहिती योग्य असल्याचे व ती वाचण्यात (ठरावाचा तपशील व सूचक-अनुमोदक इ.) श्री.जेबले यांची गल्लत होत असल्याचे स्पष्ट होते.

अन्य अर्जात दिलेल्या माहितीबाबत खुलासा मागणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये योग्य नाही. 'दोन्हीपैकी एक उत्तर खोटे आहे, असा अर्थ होतो का,' 'अवैध कामांची जबाबदारी जर ठेकेदारावर येत असेल तर त्याच नियम ुसार अवैध ठराव केल्याबद्दल सर्व संबंधितांवर कारवाई करणा का,' अशा स्वरुपाची खुलाशाची विचारणा १७ मुद्दयांमध्ये केली आहे. 'एवढ्या मोठ्या बांधकामाबाबत नगरपरिषदेचे अभियंता, उपअभियंता यांची जबाबदारी काय असते व ती त्यांनी पार पाडली का,' 'ठराव झाल्यानंतर आपल्या हे निदर्शनास आल्यानंतर आपण कामे थांबविलीत का, हा प्रकार आधी फाशी, मग चौकशी' 'या प्रकारात येतो का' अशा स्वरुपाचे प्रश्न माहिती-मागणीच्या २५ मुद्दयांमध्ये विचारले आहेत. कायद्यातील 'माहिती'च्या व्याख्येत ते बसत नाही. तरीही अशा प्रश्नांचीही उत्तरे देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी श्री.डी.के.न वडे यांनी केल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.सदानंद कोचे यांच्या आदेशाप्रमाणे खर्चाविषयीचा नेमका तपशील विहित मुदतीत जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, फलटण नगरपरिषद, फलटण, जि.सातारा यांनी दिला आहे. या बाबी लक्षात घेता जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १३.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण हरिभाऊ मगदूम
मु.पो.चिखली, ता.कागल, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत चिखली, ता.कागल, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६७ / कोल्हापूर /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण हरिभाऊ मगदूम
मु.पो.चिखली, ता.कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर श्री.इसरार अहमद पठाण

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत चिखली, ता.कागल, जि. कोल्हापूर श्री.शितल यशवंत मगदूम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>अ) सन जानेवारी २००७ ते डिसेंबर २००७<br>१.मासिक सभांचे इतिवृत्त २.ग्रामसभांचे इतिवृत्त व हजेरीपत्रक ३.पाणीपुरवठा समिती सभांचे इतिवृतत व हजेरीपत्रक<br>ब) सन ऑक्टोबर २००६ ते डिसेंबर २००७<br>१.योजनांतर्गत कामावरील जमाखर्च, विषय, बाबवार २.योजनेतर ग्रामपंचायत जमाखर्च-विषय, बाबवार. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.नारायण हरिभाऊ मगदूम यांनी चिखली, ता.कागल, जि.कोल्हापूर या ग्रामपंचायतीच्या संदर्भात मागितलेल्या माहितीबाबतच्या शुल्काचा तपशील न मिळाल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. शुल्काबाबतचा तपशील आठ दिवसात देण्याचा आदेश त्यांनी दिला. परंतु जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र यलगोंडा नूल्ले यांनी त्यानुसार तपशील दिला नाही. हा माहिती न देण्याचा प्रकार आहे, अशा कारणावरुन श्री.मगदूम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

माहितीच्या कागदपत्रांपेक्षा अवाजवी शुल्क जाणीवपूर्वक कळविले आहे, असे श्री.ना.ह.मगदूम यांनी प्रपत्रात नोंदविले, तर प्रत्येक मुद्दयानुसार कागदपत्रांचे विवरण आठ दिवसांत

कळविण्यात येईल व त्यानुसार शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत चिखली श्री.शितल यशवंत मगदूम व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कागल श्री.इसरार अहमद पठाण यांनी प्रपत्रात नमूद केले.

श्री.ना.ह.मगदूम यांनी माहिती मागितल्यानंतर त्यांना रु.२५४७४ शुल्क भरण्यास विहित मुदतीत कळविले होते, असे जन माहिती अधिकारी श्री.शितल मगदूम यांनी सांगितले. परंतु आपण मागितलेल्या माहितीची कागदपत्रे एवढी होत नसतानाही केवळ भरपूर शुल्क कळविले की अपीलकर्ता एवढे पैसे भरणार नाही व माहिती देणे टाळता येईल, असा उद्देश दिसतो, असे प्रतिपादन अपीलकर्त्याच्या वतीने डॉ.रामचंद्र बळवंत मगदूम यांनी केले. अपीलकर्त्याने प्रथम अपील केल्यानंतर ग्रामपंचायतीचा लिपिक नोटीस देण्यासाठी रात्री आपल्याकडे आला व पोहोच मागू लागला. आपण त्याला नकार दिल्यानंतर 'नोटीस घेत नाही' म्हणून सही करण्यास आपल्याला भाग पाडले. आपण नोटीस वाचलेली नाही व या प्रकाराबाबत गटविकास अधिकारी श्री.इसरार पठाण यांच्याकडे आपण तक्रार अर्ज दिला, असे श्री.ना.ह.मगदूम यांनी लेखी व तोंडी नमूद केले. मागितलेल्या माहितीच्या प्रत्येक मुद्दयापोटी देण्यात येणाऱ्या कागदपत्रांचा तपशील मिळाला पाहिजे म्हणजे कोणत्या मुद्दयाची माहिती घ्यावयाची हे आपल्याला ठरविता येईल असेही त्यांनी लेखी निवेदनात नमूद केले. श्री.नारायण हरी मगदूम यांनी मागितलेली माहिती विस्तृत आहे, कागदपत्रांच्या संख्येबाबत त्यांनी विचारणा केल्यानंतर १२६३७ पृष्ठसंख्या होत असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिखली, ता.कागल श्री.राजेंद्र यलगोंडा नूल्ले यांनी त्यांना लगेच कळविले होते, परंतु मुद्देनिहाय पृष्ठसंख्या व शुल्क कळण्याचा आग्रह त्यांनी धरल्यामुळे विलंब लागला असे जन माहिती अधिकारी श्री.शितल मगदूम व अपिलीय प्राधिकारी श्री.इसरार पठाण यांनी नमूद केले. 'विशेष अपील निर्गत मोहिमे'नंतर विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शितल मगदूम यांनी आपल्याला माहिती दिली, असे श्री.ना.ह.मगदूम यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र यलगोंडा नूल्ले यांनी शुल्क विहित मुदतीत कळविले आहे. तसेच अपीलकर्त्यांने विचारणा केल्यानंतर पृष्ठसंख्या कळविली आहे. प्रत्येक मुद्दयानुसार पृष्ठसंख्या कळविली नाही व ती कळविल्यानंतरच माहिती घ्यावयाची किंवा नाही हे आपण ठरवू, ही अपीलकर्ता यांची भूमिका योग्य नाही. हवी असलेली नेमकी माहिती त्यांनी मागितल्यास असा प्रश्न उद्‌भवणार नाही. 'एवढी पाने होतील असे आम्हाला वाटत नाही' हे अपीलकर्ता यांचे म्हणणे मान्य करता येणार नाही. त्यांना काय वाटते, हा निर्णायक घटक ठरु शकत नाही. आवश्यक असल्यास अपीलकर्ता कागदपत्रांचे निरीक्षण करु देण्याची मागणी करु शकतात व आवश्यक कागदपत्रांच्या प्रती मागू शकतात. तसेच कळविलेले शुल्क व कागदपत्रे यात मोठ्या प्रमाणावर तफावत आढळल्यास त्याबाबत तक्रारही करु शकतात.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१७.३.२००९

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१
**अपील क्र.३६८/ पुणे**

विषय :- श्री. सचितानंद चोखू कडलक यांचे द्वितीय अपिलावर आयोगाने दि. ३०.८.०८ रोजी पारित केलेल्या आदेशाबाबत

संदर्भ : आयोगाचे आदेश क. अपील/३६८/पुणे दि. ३०.८.२००८

**सुधारीत आदेश**

श्री. सचितानंद चोखू कडलक रा. कोरेगाव भिमा, ता. शिरूर यांचे द्वितीय अपिलावर आयोगाचे दि. ३०.८.२००८ रोजी आदेश पारित करून जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. ए.के.देशमुख यांनी पाच दिवस विलंब केला म्हणून रू. १२५०/- शास्ती लावण्यात आली होती.

सदर आदेश पारित केल्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार यांनी त्यांचे दि. १०.१०.२००९ रोजीचे पत्रान्वये श्री. कडलक यांचा माहितीचा अर्ज व प्रथम अपील कालावधीत जन माहिती अधिकारी श्री. ए.के. देशमुख कार्यरत नव्हते, असे निवेदन करून दि. ३०.८.२००८ रोजीचे आदेशाचे पुर्नविलोकन करणेस विनंती केली आहे.

सदर निवेदनास अनुसरुन तहसीलदार, शिरूर यांचेकडून अहवाल मागविणेत आला असता श्री. कडलक यांचे माहितीचे अर्जाचे कालावधीत जन माहिती अधिकारी म्हणून श्री. ए.के. देशमुख नसून श्रीमती एम.एल.धोत्रे, पुरवठा अव्वल कारकून ह्या कार्यरत होत्या. यावरून श्री. ए.के.देशमुख निवासी नायब तहसीलदार यांचे ऐवजी श्रीमती एम.एल.धोत्रे, पुरवठा अव्वल कारकून ह्या शास्तीस पात्र ठरतात.

दि. ३०.८.२००८ रोजीचे आदेशात दुरूस्ती करण्यात येऊन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. ए.के. देशमुख यांचे ऐवजी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अव्वल कारकून श्रीमती एम.एल. धोत्रे यांना रू. १२५०/- शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती एप्रिल २००९ या महिन्याच्या देय असलेल्या वेतनातून वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, १८, माहितीचा अधिकार ००७१००१६१' या लेखा शिर्षाखाली

जमा करण्याची कारवाई अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार शिरूर यांनी करावी. तसेच त्याबाबतची नोंद त्यांचे सेवा पुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. ३१.३.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

प्रत :

१. श्रीमती एम.एल. धोत्रे, पुरवठा अव्वल कारकून तथा तत्कालीन जन माहिती अधिकारी शिरूर, जि. पुणे
२. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरूर, जि. पुणे यांना पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : श्री. ए. के. देशमुख, तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी, सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांना माहितीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय रमाकांत सवाई
९९७/६, नवी पेठ, सत्संग सोसायटी.पुणे-३० — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महागरपालिका, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम ायंत्रण, पुणे महाागरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००६ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दत्तात्रय रमाकांत सवाई
९९७/६, नवी पेठ, सत्संग सोसायटी, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे तर्फे श्री. प्रवीण गेडाम नगर उपअभियंता

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महाागरपालिका यांचे तर्फे प्रतिनिधी
सौ. हर्षदा वि.शिंदे, सहाय्यक अभियंता

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.१२.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.३.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सत्संग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित या संस्थेच्या संदर्भातील सुधारित ले-आऊटचा तपशील व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

सत्संग सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, ११७/२१ व २२, नवी पेठ, पुणे या संस्थेतील दोन भूखंडधारक आणि कुळमुखत्यारधारक यांच्यातील वादाच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री. दत्तात्रय रमाकांत सवाई यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, यांच्याकडे मागितलेली माहिती मिळाली नाही, म्हणून त्यांनी केलेल्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने श्री.सवाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सत्संग सहकारी गृहनिर्माण संस्थेतील हा विषय सन १९९२ पासून विविध अर्जाद्वारे व न्यायालयीन प्रकरणांमध्ये मांडला गेला आहे. त्या अनुषंगाने श्री. सवाई विविध पातळ्यांवर अर्ज व अपिले करीत आले आहेत. सन २००२ पासून महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अंतर्गत व त्यानंतर केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये ही श्री. सवाई अर्ज व अपिले करीत आले आहेत. या विषयाबाबत श्री. सवाई व पुणे महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी यांनी एकत्रितरीत्या विचार करुन माहिती व मूळ अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती याबाबत निर्णय घ्यावा, असे आदेश आयोगाने याच विषयातील अपील क्र. ८/पुणे मध्ये दि.२१.५.२००७ रोजी दिले होते. राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ. सुरेश जोशी यांनी यातील एकाच अपिलाबाबत पूर्वी निर्णय दिला आहे. मात्र अशा निर्णयानंतरही श्री. सवाई अर्ज व अपिले करीत असून प्रामुख्याने संस्थेने दाखल केलेल्या दुरुस्त ले-आऊटला मान्यता देण्याच्या प्रशासकीय कार्यवाहीची मागणी ते करीत आहेत. आताचे अपील हा त्याचाच एक भाग आहे.

श्री. सवाई यांना वेळोवेळी सर्व माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, सौ. हर्षदा वि. शिंदे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. आयोगाने पूर्वीच दिलेल्या आदेशाप्रमाणे एकत्रित बैठक झाल्यानंतर श्री. सवाई यांना माहिती देण्यात आली होती. परंतु त्यांचे समाधान होत नाही, असेही प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांनी केले. सुधारित ले-आऊट बाबत श्री. सवाई आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करीत नसल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी विविध पातळ्यांवरील सुनावणीमध्ये व पत्रव्यवहारात सातत्याने नमूद

केले आहे. एकत्रित बैठकीच्या फलनिष्पतीबाबतच्या पत्रातही नगर उप अभियंता (वि.यो.), पुणे महानगरपालिका यांनी त्याचा उल्लेख केला आहे. आता विचाराधीन असलेल्या अपिलात अ) श्री. सवाई यांनी न मिळालेल्या माहितीबाबत नेमकेपणाने लेखी कळवावे. ब) या मुद्दयांची माहिती महापालिकेने तीन दिवसात द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार श्री. सवाई यांना दि. १३.८.२००८ रोजी दिलेल्या पत्रानुसार दि. १४.८.२००८ अन्वये त्यांना माहिती देण्यात आली. तक्रारीप्रमाणे सर्व माहिती मिळाली असून आता तक्रार उरली नाही, असे श्री. सवाई यांनी या पत्रावर नमूद केले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी दि. १८.८.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या पूर्तता अहवालात नमूद केले आहे. सोबत श्री. सवाई यांच्या स्वाक्षरीसह वरील मजकूर असलेल्या पत्राची प्रत सादर केली आहे. त्यानंतर श्री. सवाई यांनी पुन्हा दि. ११.९.२००८ रोजी आयोगाला पाठविलेल्या पत्रात कोणतीही माहिती मिळाली नसल्याची तक्रार केली आहे. उभय बाजूंनी सादर केलेली सर्व कागदपत्रे विचारात घेता या तक्रारीची दखल घेणे आयोगाला आवश्यक वाटत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**पुणे**
**दि. ३०.३.२००९**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय धनपाल भोजकर
ता.तळंदगे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२२ / कोल्हापूर / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय धनपाल भोजकर
ता.तळंदगे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्रीमती जयश्री भोज

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.एस.के.देसाई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.८.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २०००/२००१ या वर्षी श्री बिरदेव एजयुकेशन सोसायटी, पट्टणकोडोली, ता.हातकणंगले यांनी नवीन प्राथमिक शाळा उघडणेसाठी परवानगी मागणी करण्याकरिता केलेला अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे, तसेच जिल्हा शिक्षण समितीने केलेली शिफारशीसह सर्व कागदपत्रे. शाळा सुरु करण्यासाठी दिलेल्या प्रथम मान्यतेचे पत्र व संस्थेने प्रथम मान्यता मिळण्यासाठी एक ते नऊ मुद्यांमध्ये सादर केलेली माहिती व शिक्षण विभागाने केलेल्या शिफारशी सहीत सर्व कागदपत्रे. स्थलांतराचा प्रस्ता आला असल्यास त्याची प्रत, तसेच स्थलांतरासाठी परवानगी दिली असल्यास परवानगीची प्रत. श्री अनंत बाल विद्यामंदिर या शाळेचा सन २०००-०१ ते २००७-०८ या कालावधीचा शाळा वार्षिक तपासणी अहवाल व शाळा अनुदानासाठी केलेल्या मूल्यांकनाचा प्रस्ताव व अनुदान मंजूर झालेल्या कागदपत्राची प्रत. | |

## विवेचन

श्री बिरदेव एज्युकेशन संस्था, हातकणंगले या संस्थेने श्री अनंत बाल विद्यामंदिर या शाळेच्या स्थलांतरासाठी दाखल केलेल्या प्रस्तावाची प्रत, मूळ परवानगी दिलेले ठिकाण व सध्या शाळा चालू असलेले ठिकाण याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.संजय धनपाल भोजकर यांनी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, परंतु 'नवीन खाजगी शाळांच्या प्रस्तावाची मुदतबंद कार्यक्रमानुसार अंमलबजावणी करण्याच्या कामामुळे' विलंब झाल्याचे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी आयोगाने आयोजित केलेल्या दि.११.११.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात स्पष्ट केले. त्यांनतर आपल्याला सर्व माहिती मिळाली असून कोणतीही तक्रार राहिलेली

नाही, असे श्री.भोजकर यांनी लेखी दिलेले असल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी श्री.भोजकर यांचे अपील निकाली काढले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपील सुनावणीस घेण्यात आले.

आपल्याला शाळेच्या स्थलांतराच्या प्रस्तावाची प्रत मिळाली नाही. मुळात तहसीलदारांचा खोटा दाखल घेऊन शाळेला मान्यता घेतली, नंतर स्थलांतराचा संबंध नसताना स्थलांतराची परवानगी मिळवली. हा सर्व भाग राजकीय दबावातून होत असल्याचे उघड करण्यासाठी आपल्याला माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन श्री.भोजकर यांनी केले.

श्री.भोजकर यांचीही शिक्षण संस्था असून शिक्षणसंस्थाविषयक स्पर्धेतून श्री बिरदेव एज्युकेशन संस्था या संस्थेच्या संदर्भात विविध पातळ्यांवर व माहितीच्या अधिकाराखाली ते अर्ज, तक्रारी व अन्य पत्रव्यवहार करीत असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते.

'माहितीच्या अधिकाराखाली मागणी करण्यात आलेली माहिती समक्ष प्राप्त करुन घेऊन उपलब्ध झालेल्या माहितीसंदर्भात समक्ष येऊन चर्चा करणे आणि आपली कोणतीही तक्रार नसल्याचे लेखी लिहून देणे आणि परत नवीन अर्ज दाखल करुन त्यावर शासकीय माहिती अधिकारी यांनी तयार ठेवलेली माहिती मागणीप्रमाणे समक्ष घेऊन न जाणे आणि दरम्यानच्या काळात अपिलीय अधिकाऱ्यांकडे माहिती मिळाली नाही म्हणून अपील दाखल करणे, अपील मागे घेत असल्याबाबत कार्यालयात येऊन वारंवार तोंडी निवेदन करणे, अपिलाच्या सुनावणीस उपस्थित न रहाणे, हे अपिलदार यांचे कृत्य आक्षेपार्ह आणि कायद्यातील तरतुदींचा आधार घेऊन शासकीय कार्यालयाचे श्रम व वेळ वाया घालवण्यातला प्रकार आहे. त्यांचा माहिती मागणीमागील हेतू शुध्द वाटत नाही,' असे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर श्रीमती जयश्री भोज यांनी दि.७.११.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

स्थलांतराचा प्रस्ताव सन २००३ सालचा असून तो शासनाकडे पाठविल्याची अभिलेखात नोंद नाही, तसेच या प्रस्तावाची प्रत मिळत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री.एस.के.देसाई यांनी सांगितले.

स्थलांतराच्या प्रस्तावाव्यतिरिक्त विस्तृत अशी सर्व माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.भोजकर यांना दिली आहे. विलंबाचे त्यांनी स्पष्ट केलेले कारण योग्य आहे. अपीलकर्त्यानेही आपला शास्तीचा आग्रह नसल्याचे सुनावणीत नमूद केले. त्यामुळे शास्ती न लावण्याचा आयोगाचा निर्णय आहे.

अनंत विद्या मंदिर या शाळेच्या स्थलांतराच्या प्रस्तावाची व दिलेल्या मान्यतेच्या पत्राची प्रत शिक्षण, सहसंचालक कार्यालयात मिळू शकेल, असे अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी या दोघांचेही म्हणणे आहे. यापूर्वीच त्या कार्यालयातून ही कागदपत्रे मिळविण्याची कार्यवाही होणे आवश्यक होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अंशत: मान्य.

(२) अनंत विद्या मंदिर, पट्टणकोडोली या शाळेच्या स्थलांतरप्रस्तावाची प्रत शिक्षण, सहसंचालक,पुणे यांच्या कार्यालयाकडून जन माहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी, असा तोंडी आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याची पूर्तता करुन जन माहिती अधिकारी यानी दि.३०.३.२००९ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१६.३.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ११-११-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. मलगोंडा यलगोंडा भिकाप्पा पाटील, मु.पो. सुळकूड, ता.कागल, जि.कोल्हापूर यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|
| १ | ४३३ / कोल्हापूर | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर | कोल्हापूर जिल्हा परिषद, शिक्षण विभागाकडे दिनांक २१-०४-२००८ रोजी प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे व त्यांची जात-प्रवर्ग निहाय माहिती |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एस. के. देसाई यांनी माहिती देण्यासाठी शुल्क भरण्याबाबतचे दिनांक १७-०५-२००८ चे पत्र अपीलकर्त्यास पाठविण्याचे अनवधानाने राहिल्याचे कबूल करून अपीलकर्त्यास जाणुनबुजून माहिती देण्याचे टाळण्याचा हेतू नसल्याचे त्यांच्या दिनांक ०८-११-२००८ च्या पत्रात नमूद केले आहे. त्यांना एक वेळ सवलत देण्यात येत आहे, मात्र सदर बाब गंभीर असल्याने त्याबाबत जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. एस. के. देसाई यांना समज देण्यात येत आहे. अपीलकर्त्यास माहिती आठ दिवसांत निःशुल्क द्यावी, व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास जन माहिती अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७-०३-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आनंदा बाबू पाटील
मु.पो.मनवाड, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मनवाड,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.परिक्षीत दिलीप यादव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मनवाड,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर श्री.उमेश सुधाकर रेळेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.७.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.८.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१.मौजे मनवाड येथील ग्रामपंचायत मिळकत नं.२७४ चे पोटविभाग करण्याबाबत ठराव झाला असेल तर त्याची ठरावाची सहीशिक्क्याची प्रत. २.दि.१७.४.२००८ रोजीच्या मासिक सभेच्या विषयपत्रिकेची व मासिक सभेत झालेल्या सर्व ठरावांच्या मूळ ठराव पुस्तकांच्या छायांकित प्रती. ३.सदर मिळकतीतील संडासचे बांधकाम करण्यासाठी आनंदा गणू रेडेकर यांनी बांधकाम परवाना अर्ज दिला आहे काय, असल्यास सहीशिक्क्याची प्रत, बांधकाम परवाना पंचायतीने दिला असल्यास त्याची प्रत ४.रेडेकर यांनी संडासचे बांधकाम केव्हा पूर्ण केले त्याची माहिती. ५.ग्रामपंचायत मिळकत क्र.२७४ (२७४/१ किंवा २७४/२ नव्हे) असा ग्रामपंचायत मिळकत नंबर सध्या अस्तित्वात आहे काय, असेल तर त्याचा उतारा. | |

## विवेचन

ग्रामपंचायत मिळकत क्र.२७४ च्या संदर्भात पोटविभाग करण्याच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.आनंदा बाबू पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मनवाड, ता.गडहिंग्लज, जि. कोल्हापूर यांच्याकडे माहिती मागितली होती. दिलेली माहिती चुकीची असल्याच्या कारणावरुन श्री.पाटील यांनी केलेले अपील ते सुनावणीला उपस्थित नसल्याच्या कारणावरुन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांनी फेटाळले. त्याविरुध्द श्री.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता गैरहजर होते. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, मनवाड, ता.गडहिंग्लज यांनी दिलेली माहिती बरोबर असल्याची खात्री आपण केली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गडहिंग्लज यांनी प्रपत्रात नमूद केले. अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपील सुनावणीस घेण्यात आले.

श्री.पाटील यांनी सात मुद्दयांची माहिती मागितली होती. ती त्यांना देण्यात आली आहे. श्री.आनंदा गणू रेडेकर यांच्याकडून श्री.पाटील यानी जमीन विकत घेतली. परंतु संपूर्ण मिळकतीला ग्रामसेवकांनी नजरचुकीने श्री.पाटील यांचेच नाव लावले. त्यात दुरुस्ती करण्याचा अर्ज श्री.रेडेकर यानी केला. त्यावर ग्रामपंचायतीने ठराव करुन घर श्री.पाटील यांच्या नावे व खुली जागा श्री.रेडेकर यांच्या नावे अशा दोन स्वतंत्र मिळकत नंबर करुन नोंद केली. या ठरावाला श्री.पाटील यांचा आक्षेप आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.उमेश सुधाकर रेळेकर यांनी सांगितले. श्री.पाटील यांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्येही तसे नमूद केले आहे. श्री.रेडेकर यांना संडासचे बांधकाम करण्याची ग्रामपंचायतीने बांधकाम परवानगी दिलेली नाही, त्यामुळे तसे कळविले आहे, असे श्री.रेळेकर यांनी सांगितले. त्यांनी बांधकाम केल्याची माहिती ग्रामपंचायतीला असणे कायद्याने बंधनकारक असताना माहिती उपलब्ध नसल्याचे खोटे, चुकीचे व दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे, असा आक्षेप श्री.पाटील यांनी निवेदनात नोंदविला आहे. परंतु हा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.३.२००९